**महाराष्ट्र शासन**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४००६१४.**
☎/ 🖷:-- २२,२७५७१३११. Website:www.mahalfa.in E.Mail: *ad.prc@mahalfa.in*

**क्रमांक :- स्था १८/ब/पंरास ३/प्रस्तावित परिच्छेद / ७१/२०२३** **दिनांक :-** 20 OCT 2016

**स्थायी आदेश क्र. ०२ सन २०१६**

**विषय :-** पंचायत राज समितीच्या पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट करण्यासाठी परिच्छेद प्रस्तावित करणेबाबत.

## प्रस्तावना

स्थानिक निधी लेखापरीक्षा, कार्यालयीन नियमपुस्तिका खंड १ मधील परिच्छेद ७३४ नुसार सहसंचालक / सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचे स्तरावरुन जिल्हा परिषद विभाग व त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समित्यांचे वार्षिक लेखापरीक्षण केले जाते. लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याचा एकत्र अहवाल तयार करुन त्याचे अंतिमीकरण करुन संबंधित संस्थाप्रमुखास निर्गमित करण्यात येतो व त्याची प्रत संचालनालयास सादर केली जाते. लेखापरीक्षण करत असताना नियमबाह्य प्रदाने विहित कार्यपद्धतीचे अनुपालन न करणे, अफरातफर, प्रलंबित अग्रिमाची वसुली इत्यादी स्वरुपाच्या गंभीर अनियमितताबाबतचे निवडक परिच्छेद त्या वर्षाच्या पंचायत राज समिती पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावित केले जातात.

बऱ्याच वेळा असे आढळून आले आहे की, मूळ लेखापरीक्षण अहवालाचे वाचन व अंतिमीकरण केल्यानंतर पंचायत राज समिती अहवालात समाविष्ट करावयाच्या परिच्छेदांची निवड केली जाते. त्यामुळे मूळ लेखापरीक्षण अहवालाचे पुन्हा वाचन करुन त्यातील परिच्छेदांची निवड करण्याची प्रक्रिया केली जाते. त्यानुसार पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट करण्यासाठी संचालनालयास परिच्छेद प्रस्तावित केले जातात. मूळ लेखापरीक्षणाचे अंतिमीकरण करुन नंतर पुनर्विलोकन अहवालाचे वाचन करणे व निवड करणे अशी प्रक्रिया दोन वेळेस / दुबार राबविल्यामुळे कामाची पुनरावृत्ती होते. तसेच यासाठी अनावश्यक वेळसुद्धा वाया जातो.

पंचायत राज समिती अहवालात परिच्छेद समाविष्ट करावयाची यादी सहसंचालक यांचे स्तरावरुन विहित कालावधीत प्राप्त होत नाहीत. यासाठी संचालनालय स्तरावरुन पत्रव्यवहार करुन वारंवार पाठपुरावा करावा लागतो व पंचायत राज समितीचे पुनर्विलोकन अहवाल तयार करण्याच्या कामात खोळंबा होतो. त्यामुळे शासनास पुनर्विलोकन अहवाल सादर करण्यास विलंब होतो.

## आदेश

उक्त नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक ७३६ नुसार सर्वसाधारणपणे अर्थसंकल्पीय अधिवेशनात पंचायत राज समिती अहवाल सादर करण्याची तरतूद आहे. तत्पूर्वी अहवालासाठी लागणाऱ्या माहितीचे संकलन करणे परिच्छेद टंकलेखन करणे, टंकलिखित केलेल्या पुनर्विलोकन